महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ 10 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 253 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091



# आज 'महा' अर्थसंकल्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : महायुतीने विधानसभा निडणूक प्रचारात लाडकी बहीण योजनेंतर्गत मिळणारा लाभ २१०० रुपयांपर्यंत वाढवण्याचे आश्वासन दिले होते. तसेच शेतकऱ्यांची कर्जमाफीही करणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र अद्याप त्यावर कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. सद्यःस्थितीत राज्यावर कर्जाचा भार सुमारे आठ लाख कोटींहून अधिक आहे. या स्थितीत अर्थसंकल्पात ही दोन्ही आश्वासने पूर्ण केली जाणार का, याकडे जनतेच लक्ष आहे. तसेच राज्यातील तरुण, शेतकरी आणि मजूर आदी घटकांच्या अपेक्षांना न्याय देताना राज्य सरकारची कसोटी लागणार आहे. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार उद्या, सामेवारी राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर करणार आहेत. केंद्र सरकारचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आता महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर होत आहे. या पार्शवभूमीवरराज्याचा २०२५-२५या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प राज्याची आर्थिक ताकद, औद्योगिक विकास, रोजगार निर्मिती आणि शेतीवर लक्ष केंद्रित करणार असल्याचे दिसते. तसेच राज्याची अर्थव्यवस्था किती ट्रिलीयन डॉलरची बनवण्याचा संकल्प आहे, याची ठळक नोंद अर्थसंकल्पात निश्चत अपेक्षित आहे. विशेषतः पायाभूत सुविधांच्या विकास, शिक्षण व्यवस्था, कृषी क्षेत्र, सेवा आणि औद्योगिक क्षेत्रासाठी अन्य बाबींसाठी किती तरतूद केली जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

राज्यातील अर्थव्यवस्थेचा आकर साधारणतः पाच लाख ते साडेपाच लाख कोटींच्या आसपास आहे. यापैकी जवळपास ९ ते ९.५ टक्के निधी फक्त लाडकी बहिण योजनेसाठी आणि अन्य कल्याणकारी योजनांवर खर्ची होणार आहे.

### अजित पवार विक्रमाच्या वाटेवर :

**उपमुख्यमंत्री अजित पवार हे उद्या त्यांचा ११ वा अर्थसंकल्प सादर करतील. त्यानंतर ते शेषराव वानखेडे (१३ वेळा) यांच्यानंतर दुसरे सर्वाधिक (११) वेळा अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री ठरतील**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार उद्या (दि. 10 मार्च 2025) राज्याचा वर्ष 2025-26 चा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. नव्याने सत्तेवर आलेल्या महायुती सरकारचा हा पहिला अर्थसंकल्प असून, अर्थमंत्री म्हणून अजित पवार यांचा हा अकरावा अर्थसंकल्प असणार आहे. शेषराव वानखेडेंनंतर अजित पवार सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करत आहेत. शेतकरी, कष्टकरी, महिला, दलित, आदिवासी, विद्यार्थी, युवक हे घटक अजित पवारांच्या अर्थसंकल्पाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. 2021 चा अर्थसंकल्प 8 मार्च जागतिक महिला दिनी जाहीर करताना त्यांनी तो राज्यातील महिला शक्तिला समर्पित केला होता. 2022 चा अर्थसंकल्प स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतीदिनी 11 मार्च रोजी सादर केला होता. तो छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग, समर्पण, स्वराज्यनिष्ठेला समर्पित होता. कृषी, उद्योग, दळणवळण, आरोग्य, मनुष्यबळ विकास या पंचसूत्रीवर आधारीत अर्थसंकल्पही त्यांनी सादर केला आहे.



# प्रशासकीय राजवटीत बदलापुरात मोठा भ्रष्टाचार

## आमदार किसन कथोरेंचा आरोप चौकशीची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : कुळगाव-बदलापूर नगरपालिकेत गेल्या २०२० पासून प्रशासकीय राजवट आहे. या काळात मुख्याधिकारी आणि प्रशासक पद एकाच व्यक्तीकडे असून या कालावधीत निधीचे १० -१० लाखांचे तुकडे करून अनेक कामे केली गेली आहेत. यात कोणताही दर्जा तपासला गेला नाही. त्यामुळे अशा कामांची चौकशी करावी, अशी मागणी करत मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी एकच खळबळ उडवून दिली.

विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यावर बोलत असताना त्यांनी शिलाई मशिन आणि घरघंटी वाटपाच्या कार्यक्रमावरही आक्षेप घेत याचीही चौकशी करण्याची मागणी केली आहे. या आरोपामुळे बदलापुरातील राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघण्याची शक्यता आहे.

कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या निवडणुका २०२० वर्षात होणे अपेक्षित होते. मात्र त्याचवेळी करोना काळात लागलेली टाळेबंदी आणि नंतर विविध कारणांमुळे रखडलेली टाळेबंदी यामुळे पाच वर्षे उलटूनही निवडणूक झालेली नाही. लोकप्रतिनिधी नसल्याने मुख्याधिकारी यांच्याकडेच प्रशासक पदाचा कारभार आहे. त्यामुळे लोकांचा आणि पालिकेचा थेट संबंध संपलेला आहे. पालिकेचे ठराव, त्यांची मंजुरी, त्याचे होणारे काम, त्याची लेखापरिक्षण अशा गोष्टींबाबत सर्वसामान्य आणि लोकप्रतिनिधींना माहिती मिळत नाही. याचा गैरफायदा घेतला जात असल्याचा आरोप अनेकदा दबक्या आवाजात होत होता. मात्र विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यांवरील चर्चेत मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी याच प्रशासकीय राजवटीवर बोट ठेवत गंभीर आरोप केले आहेत. २०२० पासून प्रशासकपदाच्या काळात विविध कामात भ्रष्टाचार झाला आहे. कारभार मनमानी पद्धतीने चालतो आहे. लोकप्रतिनिधी नसल्याने अनेक कामांची माहिती नसते. अनेकदा नागरिकांच्या समस्या ऐकण्यासाठी अधिकारी उपस्थित नसतात, अशी भूमिका कथोरे यांनी बोलताना मांडली. प्रशासकांकडून सुरू असलेल्या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी कुणी नाही, त्याच्या तपासणीसाठी चांगले अधिकारी नाही. त्यामुळे या कामांची चौकशी करावी अशी मागणी कथोरे यांनी यावेळी केली.

त्याचवेळी प्रशासकांच्या काळात निधीचे वाटप १०-१० लाखांचे तुकडे करून केले गेले आहे. त्यातून कामाचा दर्जा राहिलेला नाही असाही खळबळजनक आरोप किसन कथोरे यांनी केला. त्यामुळे या कामांची चौकशी करण्याची मागणी आमदार कथोरे यांनी केली आहे. यावेळी त्यांनी मुरबाडमधील दिवाणी न्यायालये, पोलीस ठाणे आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयासाठी निधी देण्याची मागणी केली.

### घरघंटी, शिलाई मशिन वाटपाचीही चौकशी करा

कुळगाव बदलापूर नगरपालिका, महिला व बालकल्याण विभाग आणि प्रधानमंत्री खजीन क्षेत्र योजनेअंतर्गत अडीच कोटी खर्चातून शिलाई मशिन आणि घरघंटीचे वाटप महिलांना करण्यात आले होते. कोणत्याही निविदेशिवाय याचे वाटप कसे झाले, नियमभंग करून हे वाटप झाल्याने याची चौकशी करण्याची मागणी आमदार कथोरे यांनी केली. मनमानी पद्धतीने आर्थिक देवाणघेवाणीतून याचे वाटप करण्यात आल्याचाही गंभीर आरोप कथोरे यांनी केला. या उपक्रमात स्थानिक शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांचा पुढाकार होता. त्यामुळे कथोरे यांच्या आरोपानंतर आता बदलापुरातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

# महिला दिनानिमित्त जीवनदीप महाविद्यालयातर्फे महिला सन्मान मॅरेथॉन





## पाचशेहून अधिक महिलांचा सहभाग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली (प्रतिनिधी): जीवनदीप शैक्षणिक संस्था जागतिक महिला दिनानिमित्त दरवर्षी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असते यावर्षी ग्रामीण भागातील महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून समस्त महिला सन्मानार्थ जीवनदीप महाविद्यालय गोवेली आणि जीवनदीप फाउंडेशन तर्फे दि 09 मार्च 2024 रोजी टिटवाळा येथे महिला सन्मान मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते या मॅरेथॉनचे उद्घाटन कल्याण चे माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या हस्ते करण्यात आले या मॅरेथॉनमध्ये जवळपास,५००हून अधिक अधिक महिलांनी सहभाग नोंदवला होता. सहभागी महिलांचे 18 ते 30 वयोगटातील गट-अ आणि 30 पेक्षा अधिक वयोगटातील गट ब असे दोन गट तयार करण्यात आले होते यावेळी सहभागी महिलांना मोफत टी-शर्ट चे वाटप करण्यात आले या मॅरेथॉन मध्ये गट-अ मध्ये प्रथम क्रमांक धनश्री विलास पडवळ,द्वितीय क्रमांक संगीता एकनाथ दिघे आणि तृतीय क्रमांक वृषाली तुकाराम फसाळे आणि नमिता मनोहर गाडे यांनी पटकावला तसेच गट ब मध्ये प्रथम क्रमांक करिष्मा धनंजय रापकर ,द्वितीय क्रमांक रेश्मा दुंदाराम बनकरी आणि तृतीय क्रमांक वृषाली सचिन मानुखरे यांनी पटकावला. विजेत्या महिलांना रोख रक्कम, पैठणी साडी आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले तसेच सहभागी सर्व महिलांना प्रमाणपत्र देण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नरेश टेंबे आणि



प्रा. सतीश लकडे यांनी केले. या कार्यक्रमास जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, भाजप सरचिटणीस कल्याण चिंतामणी मगर ,उपाध्यक्ष ठाणे जिल्हा राम सुरोशी ,माजी सरपंच घोटसई रसिका मगर, घोटसई माजी उपसरपंच वनिता मगर, उपसरपंच घोटसई रोशनी धुमाळ, ग्रामपंचायत सदस्य घोटसई दया मगर, घोटसई सरपंच राजू मगर, सरपंच बापसई प्रणिता टेंभे , डॉ.सुनीलदत्त गवरे दिपालीताई बुटेरे पोई सरपंच ,माजी सरपंच गोवेली सुरेखा भोईर, पोलीस उपनिरीक्षक अतुल मडके ,उपसभापती बाजार समिती कल्याण प्रकाश भोईर, योगेश धुमाळ संचालक बाजार समिती कल्याण, अशोक भोईर सभा कार्यकर्ते ,भगवान कोर, दीपक जाधव, राजाभाऊ चौधरी, मेसाजी भोईर, , सुयोग मगर,विशाल रोहणे ,आकाश सुरोशे, दिलीप बुटेरे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ के.बी कोरे, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश रोहणे, क्रिडा विभाग प्रमुख प्रा. मोहनीश देशमुख,प्रा. दिनेश धनगर ,प्रा. गगन सकपाळ प्रा. जया देशमुखप्रा. मीना मुलीकप्रा. प्रविण भालेराव,सर्व प्राध्यापक प्राध्यापिका , विद्यार्थी आणि महिला भगिनींच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला.

# उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयात रुग्णांचे हाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर, ता. ९ (वार्ताहर) :

उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात आरोग्य यंत्रणेची गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत होणारी ऑर्थोपेडिक इम्प्लांट ऑपरेशन दीड ते दोन महिन्यांपासून रखडली आहेत. आवश्यक शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेल्या रुग्णांना बेडवरच हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. आर्थिक दुर्लक्षामुळे या रुग्णालयात उपचारांची परिस्थिती बिकट झाली असून, गरजू रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत ऑर्थोपेडिक इम्प्लांट सर्जरीसाठी लागणारे साहित्य रुग्णालयात उपलब्ध नाही. याचे कारण म्हणजे योजनेचे बिल थकल्याने पुरवठादारांनी रॉड व अन्य साहित्यपुरवठा थांबवला आहे. परिणामी, पायात रॉड टाकण्यासाठी दाखल झालेल्या रुग्णांना दीड-दोन महिन्यांपासून प्रतीक्षा करावी लागत आहे. या रुग्णांपैकी बहुतांश जण सामान्य आर्थिक परिस्थितीतील कुटुंबांतील आहेत. त्यांना खासगी रुग्णालयात



उपचार घेणे परवडणारे नाही. अनेकांना उदरनिर्वाहाचा प्रश्न भेडसावत आहे. शस्त्रक्रिया लांबणीवर पडल्यामुळे रुग्णांना हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहे. या परिस्थितीची दखल घेत ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख धनंजय बोडारे यांनी मध्यवर्ती रुग्णालयात भेट देऊन डॉक्टरांशी चर्चा केली. योजना राबवणाऱ्या अधिकाऱ्यांना त्वरित यावर उपाययोजना करण्याचे निवेदन दिले आहे. जर त्वरित निर्णय घेतला नाही, तर ठाकरे गट रुग्णांच्या न्यायासाठी आंदोलन करेल, असा इशारा बोडारे यांनी दिला आहे.

मध्यवर्ती रुग्णालयातील ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून, गरजू रुग्णांची तातडीने शस्त्रक्रिया होणे गरजेचे आहे. सरकारने त्वरित योजनेच्या थकीत निधीची तरतूद करून रुग्णालयाच्या कामकाजाला गती दिली नाही, तर रुग्ण हक्कांसाठी तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा सामाजिक संघटनांनी दिला आहे. रुग्णांचे हाल, प्रशासनाची उदासीनता आणि सरकारच्या दिरंगाईमुळे मध्यवर्ती रुग्णालयाचा आरोग्य व्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होत आहे. आता या बिकट परिस्थितीला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# भारताचा न्यूझीलंडवर ऐतिहासिक विजय



## चॅम्पियन्स ट्रॉफीवर कोरलं नाव!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी करत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे जेतेपद पटकावले आहे. भारताने न्यूझीलंडचा अंतिम सामन्यात ४ विकेट्सने पराभव केला. जडेजाने ४९व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजयी चौकार लगावत संघाला विजय मिळवून दिला. भारताने रोहित शर्माच्या नेतृत्त्वाखाली संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावता ही स्पर्धा आपल्या नावे केली आहे.

न्यूझीलंडने दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा कर्णधार रोहित शर्माने वादळी खेळी करत संघाच्या विजयाच्या पाया रचला. रोहित शर्माने ८३ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ७६ धावा केल्या, तर शुबमन गिलने ५० चेंडूत एका षटकारासह ३१ धावा केल्या. श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलच्या भागीदारीने भारताला सामन्यात कायम ठेवलं. श्रेयस अय्यर ६२ चेंडूत २ चौकार २ षटकारांसह ४८ धावा करत बाद झाला. तर अक्षर पटेलने ४० चेंडूत १ चौकार १ षटकारासह २९ धावा करत बाद झाला. तर राहुल आणि हार्दिकने भारताला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. तर रवींद्र जडेजाने विजयी चौकारासह भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

न्यूझीलंड संघाने नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण पुन्हा एकदा भारताच्या फिरकी चौकडीने आपली कामगिरी चोख बजावली. भारताच्या फिरकी विभागाने चांगली कामगिरी करत धावांवर अंकुश ठेवला आणि न्यूझीलंडला २५१ धावांवर रोखलं. रचिन रवींद्र आणि विल यंगने किवी संघाला अर्धशतकी भागीदारी रचत चांगली सुरूवात केली. पण रोहित शर्माची रणनिती आणि भारताच्या फिरकी विभागाने टीम इंडियाला सामन्यात परत आणले. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्रने ३७ धावा, डॅरिल मिचेलने ६३ धावा आणि ब्रेसवेलने ५३ धावांची खेळी केली.



वाचक मनोगत

# मराठी भाषिकांच्या संख्येत घट होतेय ?

भारतात बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा क्रमांक तिसरा आहे. हिंदी अव्वल तर तेलुगू तिसऱ्या स्थानी आहे. महाराष्ट्रामध्ये 69 टक्के लोक मराठी भाषा तर 13 टक्के लोक हिंदी बोलतात, असं जनगणनेची आकडेवारी सांगते. या आकडेवारीसंदर्भात आम्ही ज्येष्ठ भाषातज्ज्ञ गणेश देवी यांच्याशी बातचीत केली होती. ते म्हणाले होते, "हिंदीची वाढ महाराष्ट्र, भारतातच नाही तर जगभर झाली आहे. जगभरातल्या 60 देशांनी हिंदी भाषेला तिथली अधिकृत भाषा म्हणून मान्यता दिली आहे. हिंदी भाषेच्या या वृद्धीमध्ये हिंदी सिनेमाचा वाटा मोठा आहे. त्यामुळे अर्थातच महाराष्ट्रात हिंदी ही दुसऱ्या क्रमाकांची भाषा आहे. मराठी आणि हिंदीमध्ये 70 टक्के शब्द समान आहेत हेही आपण लक्षात घेतलं पाहिजे." प्रत्येक मुंबईकराचं मूळ काय याबाबत ठोस माहिती उपलब्ध नाही. मात्र 2011 जनगणनेच्या सखोल अभ्यासानंतर मुंबईत हिंदीभाषिकांची संख्या वाढली असल्याचं स्पष्ट झालं आहे. 2001 मध्ये मुंबईत 25.88 लाख लोकांनी हिंदी ही मातृभाषा असल्याचं सागितलं होतं. 2011 मध्ये ही संख्या 35.98 लाख एवढी झाल्याचं स्पष्ट झालं आहे. त्याचवेळी मराठी ही मातृभाषा असल्याचं सांगणाऱ्या मुंबईकरांची संख्या 2.64 टक्क्यांनी कमी झाली आहे. 45.23 लाखांवरुन ही संख्या 44.04 लाख एवढी झाली आहे.

मुंबईसह ठाणे तसंच रायगड जिल्ह्यात हिंदी भाषिकांची संख्या 80 टक्क्यांनी वाढ झाली आहे. व्यापारी बंदराचं शहर असलेल्या मुंबईत नव्वदीच्या दशकात टेक्सटाईल मिल्स अर्थात कापड गिरणी उद्योग फोफावला. गिरणी उद्योगासाठी लागणारं मनुष्यबळ स्थलांतरितांच्या माध्यमातून मिळालं. 1921मध्ये मुंबईतल्या स्थलांतरितांचं प्रमाण 84 टक्के होतं. बहुंताशी स्थलांतरित कोकण, पश्चिम महाराष्ट्र, गुजरातचा काही भाग आणि गोव्यातून आले होते. मुंबईला व्यापारी तसंच औद्योगिक शहर म्हणून ओळख मिळवून देण्यात स्थलांतरितांचा वाटा मोलाचा आहे. मात्र गेल्या 40 वर्षात टेक्सटाईल्स मिल्सची धडधड हळूहळू कमी होत गेली. बहुतांश गिरण्या बंद पडल्या तर काही गुजरातला गेल्या. उत्पादन केंद्र असं स्वरुप असलेल्या मुंबईची नवी ओळख सेवा केंद्र अशी झाली.

या टप्प्यापर्यंतचं स्थलांतर राज्यांतर्गत होतं. गिरण्या बंद पडल्यावर त्यांच्यापुढे उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला. उत्तर प्रदेश आणि बिहारमधून आलेल्या माणसांच्या रुपात कमी किमतीत मनुष्यबळ उपलब्ध झालं. 2001 मध्ये महाराष्ट्रातून मुंबईत येणाऱ्यांचं प्रमाण 41.6 होतं. 2011 मध्ये हे प्रमाण 37.4 टक्के झालं. याच काळात उत्तर प्रदेशातून महाराष्ट्रात आलेल्या लोकांचं प्रमाण 12 वरून 24 टक्के झालं. मुंबईत मराठीभाषिकांचं प्रमाण सर्वाधिक आहे. त्याखालोखाल हिंदीभाषिकांचा क्रमांक आहे. ऊर्दूभाषिक तिसऱ्या तर गुजरातीभाषिक चौथ्या क्रमांकावर आहेत. मात्र मराठी ही मातृभाषा असणाऱ्यांच्या संख्येत घट झाली आहे.

शोभा रमाकांत वानखेडे
उल्हासनगर, ठाणे

# प्लास्टिकमुक्त सण !

## प्लास्टिक पिशव्यांवर बंदी काळाची गरज



**राज्य सरकारने प्लास्टिक बंदी लागू केल्यावर त्याची अंमलबजावणी सर्वच स्थानिक महापालिकांकडून केली जात आहे. त्यासाठी प्लास्टिक जप्त करून करोडो रुपयांचा दंड वसूल करण्यात येत आहे. मात्र तरिही होळी सणाच्या पार्श्वभूमीवर प्लास्टिक पिशव्यांची विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्याने पालिकेच्या प्लास्टिक विरोधी कारवाईचे धिंडवडे निघाल्याचे चित्र राज्यात दिसत आहे.**

काही दिवसांवर येणाऱ्या होळी आणि धुलिवंदनची धूम बच्चे कंपनीमध्ये आतापासूनच सुरु झाली आहे. होळीनिमित्त पाण्याने भरायचे फुगे आता दुर्मिळ झाल्याने गेल्या काही वर्षांपासून मुलांकडून जाडीने अत्यंत पातळ असणाऱ्या पिशव्यांचा फुग्यांप्रमाणे वापर केला जात आहे. दरवर्षी होळीच्या अनुषंगाने अशा पातळ पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. या पिशव्या फुटल्यावर त्यांचे तुकडे आहे तिथेच पडून राहतात. होळी आणि धुलीवंदनाच्या दिवशी रस्त्यांवर या पिशव्यांचा अक्षरशः खच पडलेला पाहायला मिळतो. याच पिशव्या हवेमुळे जवळच्या गटारांत आणि नाल्यांत जातात आणि पुढे जे व्हायचे तेच होते. दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात या पिशव्या येतात कुठून हा प्रश्न त्यावेळी सर्वांनाच पडतो. प्लास्टिक पिशव्यांविरुद्धच्या मोहिमेअंतर्गत सरकारी कर्मचारी विक्रेत्यांवर कारवाई करतात; मात्र या कमी जाडीच्या पिशव्या ज्या ठिकाणी तयार केल्या जातात त्या कारखान्यांवर किंवा त्यांच्या घाऊक व्यापाऱ्यांवर सरकारी अधिकाऱ्यांकडून कारवाई केली गेल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. त्यामुळे प्लास्टिक पिशव्यांविरुद्ध सरकारची अधूनमधून उघडली जाणारी मोहीम ही पर्यावरणाच्या रक्षणासाठी असते की केवळ दंडवसुलीतून महसूल मिळवण्यासाठी असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडल्यावाचून राहत नाही. २६ जुलै २००५ या दिवशी झालेल्या मुसळधार पावसाने साऱ्या मुंबईची तुंबई करून टाकली. मुंबई नगरीत आलेल्या या महापुराने शेकडों निष्पाप नागरिकांचा बळी घेतला. अनेकांच्या घरात पाणी शिरून कोट्यवधी रुपयांची वित्तीय हानी झाली. या महाप्रलयामागील कारणमीमांसा तपासताना अतिक्रमणामुळे मिठी नदीचे अरुंद होत चाललेले पात्र, नाल्यांच्या साफसफाईतील अनियमितता, स्थानिक लोकप्रतिनिधींचा हलगर्जीपणा यासांसारख्या अनेक गोष्टींवर चर्चा झाली. नाल्यांचा साफसफाईतील मोठा अडसर असतो तो प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा. या प्लास्टिक पिशव्या गटारांच्या जाळया निकामी करतात. ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पातळ पिशव्यांचा पुनर्वापर शक्य होत नाही. गटारांच्या जाळयांना असे पातळ प्लास्टिक चिकटल्यास पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पाणी बराच काळ बाहेर तुंबून राहते. जमिनीच्या तळाशी प्लास्टिक चिकटून राहिल्यास पाण्याचे नैसर्गिक स्रोत बंद होतात.

कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून अन्न शोधताना बऱ्याचदा प्लास्टिकच्या पिशव्या जनावरांच्या पोटात जातात ज्यामुळे त्यांचा जीवही जातो. पातळ प्लॉस्टिक पिशव्यांच्या संदर्भात नैसर्गिकरित्या कुजण्याची किंवा नष्ट होण्याची प्रक्रिया होत नसल्याने वर्षोनुवर्षे या पिशव्या तग धरून राहतात त्यामुळे अशा पातळ पिशव्यांवर बंदी घालणेच इष्ट असल्याचे लक्षात येऊन राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांवर कायद्याने बंदी घालण्यात आली. बंदी येताच सरकारच्या वतीने भरारी पथकांची नेमणूक करून प्लास्टिक पिशव्यांचे स्रोत असलेल्या किराणा मालाच्या, फळांच्या, भाज्यांच्या दुकानांवर धाडी टाकून ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आल्या आणि त्या देणाऱ्या विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली ज्यामधून सरकार दरबारी लाखोंचा महसूल गोळा झाला. सरकारच्या अन्य मोहिमांप्रमाणे ही मोहीमही काही दिवसांनी थंड पडली, पातळ पिशव्या पुन्हा बाजारांत भाजी, फळे, मासे विक्रत्यांकडे दिसू लागल्या. कालांतराने कोणीतरी न्यायालयात याचिका दाखल करून, सरकार दरबारी निवेदने देऊन किंवा विरोधी पक्षाच्या निदर्शनास आणून देऊन राज्यात प्लास्टिक पिशव्यांवरील बंदीचे कसे तीनतेरा वाजले आहेत ही बाब निदर्शनास आणून देते आणि पुन्हा एकदा सरकार खडबडून जागे होते. पुन्हा नव्याने कारवाईला सुरुवात होते. २००५ सालापासून आजतागायत प्लास्टिक पिशव्यांसह समस्त प्लास्टिक वस्तूंवर ६-७ वेळा बंदीची मोहीम उघडण्यात आली असून सहाही वेळा ही मोहीम काही कालावधी चालल्यानंतर पुन्हा बंद पडली आहे.

१ जुलै २०२२ पासून राज्यात प्लास्टिक(काही अपवाद वगळता) आणि थर्माकोल यांवर कायमस्वरूपी बंदी आणण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी प्लास्टीकचा 'प' सुद्धा माहित नसणाऱ्या जगाला आज प्लास्टिकशिवाय जगणेही कठीण वाटू लागले आहे, त्यामुळे प्लास्टिकवरील बंदी यशस्वी होईल का याविषयी त्यावेळीच लोकांच्या मनात संभ्रम होता. सरकारच्या वतीने प्लॅस्टिकच्या सर्व वस्तूंना पर्यायही सुचवण्यात आले होते. त्या दरम्यान कापडी पिशव्यांना भलतेच महत्व प्राप्त झाले होते. पानाच्या टपऱ्यांपासून, वर्तमान पत्र विक्रेत्यांपासून ते हार्डवेअरच्या दुकानानांपर्यंत सर्वत्र कापडी पिशव्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे चित्र त्यावेळी पाहायला मिळत होते. ही मोहीमसुद्धा अपेक्षेप्रमाणे काही काळानंतर थंडावली. आजमितीला किराणा मालाचे दुकान, भाजीविक्रेता, फळ विक्रेता, मांस मटण विक्रेता, कापड विक्रेता, भांडी विक्रेता आदी सर्वांकडे प्लास्टिकच्या पातळ पिशव्या ग्राहकांना ना मागताही मिळू लागल्या आहेत. ट्रेन आणि एसटीमध्ये येणारे खाद्यपदार्थ आणि भाजी-फळ विक्रेतेही १०-१५ रुपयांच्या खरेदीवर या पातळ पिशव्या सहजपणे लोकांना बहाल करू लागले आहेत.

प्लास्टिक पिशव्यांविरुद्धची मोहीम यशस्वी करण्यासाठी विक्रेते आणि ग्राहक यांचे सहकार्य अत्यंत मोलाचे आहे. ग्राहक सोबत कापडी पिशव्या बाळगत नसल्याने लहान सहन वस्तूंच्या खरेदीनंतरही विक्रेत्यांकडून पिशवीची मागणी करतात. ग्राहक नाराज होऊन अन्य दुकानांत खरेदीसाठी जाऊ नये म्हणून विक्रेतेही ग्राहकांना देण्यास परवडतील अशा हलक्या दर्जाच्या आणि कमी जाडीच्या पिशव्या दुकानांत ठेवतात. ग्राहकांची मागणी आणि विक्रेत्यांचा नाईलाज यामुळे प्लास्टिक पिशव्यांना सध्यातरी बाजारात मरण नाही. गरज आणि पुरवठा या समांतर चालणाऱ्या बाबी असून गरज घटली किंवा नष्ट झाली कि पुरवठाही आपसूकच थांबतो या न्यायाने प्लॅस्टिकच्या पिशव्यांची जनमानसांत निर्माण झालेली गरज आज थांबवली गेली पाहिजे. पर्यावरणाचा समतोल ढासळण्यास कारणीभूत असणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्याच्या दृष्टीने व्यापक जनप्रबोधन काळाची गरज असून त्यासाठी संबंधित सरकारी खात्यांसह सेवाभावी, सामाजिक आणि निसर्गप्रेमी संस्थांनी पुढाकार घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे अन्यथा येणाऱ्या काळात २६ जुलैपेक्षा मोठा प्रलय पाहावा लागेल.

जगन घाणेकर;
घाटकोपर, मुंबई

# वृद्ध महिलेच्या उध्वस्त संसाराला महापालिकेचा आसरा

वसई- महापालिकेने इमारत जमीनदोस्त केल्यानंतर बेघर झालेल्या मुनिरा शेख या ८० वर्षांच्या वृध्देला अखेर वसई विरार महापालिकेने आश्रय दिला आहे. याबाबतच्या बातम्या वृत्तपत्रांमधून प्रसिध्द झाल्यानंतर पालिकेने त्वरीत मुनिरा शेख यांना वालीव येथील निवारा केंद्रात नेऊन राहण्याची व्यवस्था केली आहे. नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथे बांधण्यात आलेल्या ४१ अनधिकृत इमारती वसई विरार महापालिकेने जमीनदोस्त केल्या. यामुळे २ हजार कुटुंबे विस्थापित झाली. रोशनी इमारतीत राहणाऱ्या मुनिरा शेख या एकट्याच रहात होत्या. त्यांना कुणी जवळचे नातेवाईक नव्हते किंवा दुसरीकडे घर घेऊन राहण्यासाठी पैसेही नव्हते. त्यामुळे त्या एकट्याच या इमारत पाडलेल्या ठिकाणी रहात होत्या. याबाबतचे वृत्त लोकसत्ता मध्ये प्रसिध्द झाले होते. त्यामुळे वृध्द महिलेबाबत सर्वत्र हळहळ व्यक्त होत होती. अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे यांनी देखील परिस्थितीचे गाभिर्य ओळखून पालिकेचे पथक पाठवले. मुनिरा शेख यांची व्यवस्था वालिवच्या पालिकेच्या बेघर निवारा केंद्रात करण्यात आली होती. मुनिरा शेख यांना यापूर्वी वाईट अनुभव आले होते. त्यामुळे सुरवातील त्या जायला तयार नव्हत्या. परंतु आम्ही त्यांची समजूत काढून त्यांना या केंद्रात नेले. तेथे त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या सेवेसाठी एक मदतनीसही देण्यात आल्याची माहिती बेघर निवारा केंद्राच्या प्रमुख रुपाली कदम यांनी दिली.




वसई- नालासोपारा येथील ४१ अनधिकृत इमारती जमीनदोस्त झाल्या असून त्या ठिकाणी आता मातीचे ढिगारे उरले आहे. बेघर झालेले रहिवाशी वाट मिळेल तिथे गेले आहे. मात्र या इमारतीमधील बेघर झालेली ८० वर्षांची एक निराधार वृद्धा या ढिगाऱ्याजवळच मागील १५ दिवसांपासून बसून होती. ना नातेवाईक, ना दुसरे घर घेण्यासाठी पैसे, त्यामुळे आपल्या उद्धवस्त झालेल्या संसाराकडे हताशपणे वाट बघत आता ती आयुष्याची संध्याकाळ होण्याची वाट बघत होती.

नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथील आरक्षित जागेवर भूमाफियांनी ४१ अनधिकृत इमारती बांधल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वसई विरार महापालिकेने ४१ इमारती जमीनदोस्त केल्या. या इमारतींमधील दोन हजार कुटुंबे बेघर झाली. या रहिवाशांना जिथे भाड्याने घर घेणे शक्य झाले तिथे ते निघून गेले. आता या ठिकाणी फक्त मातीचे ढिगारे आणि तुटलेल्या इमारतींचे भग्नावशेष शिल्लक आहेत. याच ढिगाऱ्यावर मुनिरा शेख (८०) या वयोवृद्ध महिला पालिकेच्या तोडक कारवाई देखील 15 दिवसांपासून तशाच बसून होत्या. त्या एकट्याच रोशनी अपार्मटमेंटमध्ये रहात होत्या. त्यांना कुणी नातेवाईक नाही. त्यामुळे त्या एकट्याच खाटेवरच हताशपणे बसल्या आहेत. मुनिरा शेख पूर्वी वांद्रे येथील बेहरमपाडा येथे रहात होत्या. ३० वर्षांपूर्वी पतीसोबत घटस्फोट झाला. त्यानंतर त्यांनी अग्रवाल नगरी येथील रोशनी अपार्टमेंटमध्ये ३०० चौरस फुटांचे घर विकत घेतले. ४१ पैकी ही पहिली इमारत होती. आयुष्यभराची जमवलेली ४ लाखांची पुंजी या घरासाठी लावली. घरकाम करून त्या आपला उदरनिर्वाह करत होत्या. १४ फेब्रुवारी रोजी पालिकेने रोशनी इमारत तोडली आणि मुनिरा रस्त्यावर आल्या. त्यांचे कुणीच नातेवाईक नाही. तिच्या बहिणीची मुले परभणीत राहतात. पण त्यांनी देखील संपर्क तोडला आहे. दुसरीकडे रहायला जायचं तर मासिक ५ हजार भाडे आणि ३० हजार डिपॉझिट द्यावे लागतील. तेवढे पैसे माझ्याकडे नाहीत. मी आता कामही करू शकत नाही. मला शेजारी पाजारी मदत करत होते. पण ते स्वत: बेघर झाल्याने ते तरी माझी काळजी कशी करणार असा हताश सवाल मुनिरा शेख यांनी केला. काही सामाजिक संस्थानी आश्रय देण्याची तयारी दर्शवली पण त्यासाठी नमाज पठण करणे सोडण्याची अट घातली. त्याला मुनिरा तयार नाहीत. त्यामुळे त्यांची परिस्थिती आता खूप बिकट झाली आहे. काही सामाजिक कार्यकर्ते मला इथे जेवण देतात. त्यावर मी एकेक दिवस ढकलत आहे. माझ्या सर्व आशा संपल्या आहेत. माझ्या आयुष्याची संध्याकाळ सुरू आहे आणि आता शेवटाची वाट बघत असल्याचे त्यांनी सांगितले.

> मुनिरा शेख यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून त्या व्यवस्थित आहेत. त्यांच्या राहण्याची, जेवणाची व आरोग्याची संपूर्ण जबाबदारी घेतली जाईल. त्यांना राहण्यासाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यांची काळजी घेवून पुनर्वसन मनपा मार्फत करण्यात येईल
> -अनिलकुमार पवार,
> आयुक्त वसई विरार महापालिका

# शिळफाटा परिसरात अनधिकृत बांधकामांच्या तक्रारी वाढल्या



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघातील शिळगाव आणि परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामं असून आजही बांधकामे सुरु आहेत. कल्याण ग्रामीण विधानसभेतील लकी कंपाउंड दुर्घटनेला आता ११ वर्ष पूर्ण होत आहेत. मात्र त्यानंतर देखील परिसरात अनधिकृत बांधकामं वाढत असून त्याकडे महानगरपालिका कानाडोळा करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ठाणे मनपाने मुंबई उच्च न्यायालयात ५२ अनधिकृत इमारती असल्याचे सांगितले आहे. तर या भागात ५२ नाही तर त्यापेक्षा अधिक अनधिकृत इमारती असल्याचा आरोप दक्ष नागरिक संघटेनचे शरद पाटील यांनी पत्रकार परिषद घेत केला आहे.

कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रात येणाऱ्या शिळफाटा परिसरात अनधिकृत बांधकामांचा पेव वाढत चालला आहे. या परिसरातील वाढत शासकीय जमिनींवरील अतिक्रमण अत्यंत चिंतेची बाब झाली आहे. आठवड्याच्या प्रत्येक रविवारी बिल्डिंगवर एक स्लॅब पडत असल्याचा आरोप देखील या पत्रकार परिषदेत करण्यात आला आहे. शिळफाटा परिसरातील लकी कंपाउंड दुर्घटनेला ११ वर्षे पूर्ण होत आहेत. या इमारत दुर्घटनेत ७४ निष्पाप नागरिकांचा जीव गेला होता. त्यांना अद्याप न्याय मिळाला नसल्याचे तत्कालीन साक्षीदार शरद पाटील व पोलीस पाटील संतोष भोईर यांनी सांगितले आहे. ज्या ठिकाणी दुर्घटना घडली होती त्या जागेत स्मारक उभ करणे गरजेचे असताना तिथे अनाधिकृत बांधकामे झाली आहेत. असा आरोप पत्रकार परिषदेत करण्यात आला आहे.

शिळफाटा परिसरातील या अनधिकृत बांधकामांचा मुद्दा तत्कालीन आमदार राजू पाटील, संजय केळकर, जितेंद्र आव्हाड यांनी मांडले होते. आज शिळफाटा विभागात ५२ बिल्डिंग पाडण्याचे आदेश आहे. या ५२ इमारतींमुळे शासनाचा सुमारे १०० कोटी पेक्षा अधिक महसुल बुडला आहे. शिळ गावचे पोलीस पाटील संतोष भोईर, मनसे विभाग अध्यक्ष शरद पाटील, काँग्रेस महिला अध्यक्ष ठाणे वैशाली भोसले यांनी पत्रकार परिषद घेत सरकारला विनंती केली आहे, जर आपण भ्रष्टाच्यारी नसाल तर लवकरात लवकर आपण कारवाई करावी. आजवर झालेल्या एमआटीपी देखिल तपासुन पाहाव्यात आणि लकी कंपाउंड मध्ये जीव गेलेल्या निष्पाप नागरिकांचा न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

शिळफाटा परिसरात वाढतील अनधिकृत बांधकाम रोखण्यासाठी ठाणे मनपाने मनिष जोशी या अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. मात्र आजतगायत शिळफाटा विभागात शेकडो अधिक अनाधिकृत बिल्डिंग उभ्या राहिल्या आहेत. या इमारती उभ्या राहण्याचे कारण म्हणजे प्रत्येक स्लॅब मागे ३ ते ५ लाख घेतले जातात. त्याचा हिस्सा कोण कोण खातो हे जग जाहीर आहे. वसुलीसाठी अधिकारी यांनी माणस ठेवली आहेत. ठाणे मनपाचे अधिकारी अनाधिकृत बांधकामांचा स्कॅम चालवतात. या प्रकरणात यांना चालवणारा आका कोण आहे ? हे देखिल जनतेला ठाऊक आहे. यामध्ये अधिकारी यांचा खारीचा वाटा आहे.

सरकारी जागांवर होणाऱ्या बांधकामाचे कारवाई न होण्यासाठी ठाण्यातील आका आणि लोकप्रतिनिधींचे फोन येत असतात. फोन करण्या पुर्वी लोक प्रतिनिधींनी यांची शहानिशा केली पाहीजे. आपला कार्यकर्ता आपल्या नाव वापरून काय करतो याची माहिती लोकप्रतिनिधी ठेवायला हवी. अनाधिकृत बांधकामाचे पैसे घेतले जातातच पण सरकारी जागा हडपण्यासाठी खालच्या अधिकाऱ्यांना पैसे दिले जातात. मंडळ अधिकारी, तहसिलदार, वन अधिकाऱ्यांना ९ बिल्डिंगचे आदेश असताना मनिष जोशी यांच्याकडून कारवाई होत नाही.

त्या नंतर ठाणे महापालिका कडुन ५२ अनाधिकृत इमारतींचा अफीडिव्हेड कोर्टात सहाय्यक आयुक्त फारुख शेख कडुन सादर केले गेले आहे. या ९ इमारतींचे वीज व पाणी कनेक्शन तोडण्यात आल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले आहे. मात्र आजही त्यांना या सोयी पुरवल्या जात आहेत त्याचे पुरावे देखील आहेत. शिळफाटा परिसरातील बंधकांच्या प्रश्नी न्यायालयाचा अवमान केला गेला आहे. मुळात वीज कनेक्शन आणि पाणी कनेक्शन बंद केले नाहीत. या विभागात केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, एमआयडीसी,वन विभागाच्या आरक्षित भूखंडावर अनाधिकृत बांधकामे सर्रास सुरू आहेत. मात्र अधिकाऱ्यांना निदर्शनास आणून देऊन सुद्धा कारवाई होत नसल्याचं आरोप करण्यात आला आहे.

सहाय्यक आयुक्तांना मोहरा बनऊन मनिष जोशी, महेश आहेर यांसारखे अधिकारी अनाधिकृत बांधकामाना जबाबदार आहेत. त्या मध्ये प्रशासकीय अधिकारी देखिल तितकेच जबाबदार आहेत. मुख्यमंत्र्यांच्या व हाय कोर्टाच्या आदेशांना पायदळी तुडवले जात आहे. कारण येथे खायाचे वेगले आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. असा आरोप शरद पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

# सम्राट अशोक विद्यालय एक आदर्श शाळा

## - निलेश शिंदे यांचं प्रतिपादन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महिला दिनाचे औचित्य साधतं सम्राट अशोक विद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला . या कार्यक्रमास शिवसेना शहर प्रमुख तथा माजी नगरसेवक निलेश शिंदे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते . निलेश शिंदे यांनी या शाळेत शिक्षण घेत असलेल्या काही गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या दत्तक घेतले आहे . या मुलांनी निलेश शिंदे यांचा या समारंभात विशेष असा सत्कार केला.

आपल्या सत्काराला उत्तर देतांना त्यांनी सांगितले की सम्राट शाळेतून कल्याण पूर्वेतील अनेक माजी विद्यार्थी उच्च पदांवर पोहचले आहेत. या शाळेतून डॉक्टर, इंजिनिअर त्याच बरोबर भारतीय सैन्य दलातही सेवा देणारे हिरे घडवले आहेत . ही शाळा गरीबांची जरी असली तरीही या शाळेतून शिक्षण घेवून हिरेच बाहेर पडत आहेत त्या मुळे ही शाळा शैक्षणिक क्षेत्रात श्रीमंत आहे. यावेळी आंतराष्ट्रीय खेळाडू डिंपल धाईफुले, भारतीय सैन्य दलातील सेवा निवृत्त आणि शाळेचा माजी विद्यार्थी अल्पेश दगडे , समाजसेवक संदेश गायकवाड , मुख्याध्यापक गुलाबराव पाटील, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पी. टी. धनविजय , प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुजाता नलावडे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या स्पर्धक विद्यार्थांचा प्रशस्ती पत्र, सन्मानचिन्हे तसेच मेडल देवून सन्मानित करण्यात आले.



बदलत्या पर्यावरणामुळे पशुपक्ष्यांचा ऱ्हास होतोय त्याच्यावर सखोल अभ्यास करणारी शाळेचे माजी विद्यार्थिनी जया वाघमारे व नुकतीच डॉक्टर झालेली डॉ. पूजा मुठे यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गणेश पाटील यांनी केले . तर आभार संतोष कदम यांनी मानले कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तर पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



सोमवार
१० मार्च २०२५

**मेष**
संभ्रमाची स्थिती संपेल. आज तुम्हाला काही कामातून मोठा फायदा होणार आहे.

**वृषभ**
पूर्ण कामे पूर्ण होतील. खर्चात वाढ झाल्याने बचत करणे कठीण होईल. आज भाग्य तुम्हाला पूर्ण साथ देईल.

**मिथुन**
तुमचा जोडीदार आज काहीतरी करेल ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. व्यवसायात अनपेक्षित लाभ

**कर्क**
आज काही गोष्टी समोर येतील ज्या भविष्यात फायदेशीर ठरतील. काही नवीन काम सुरू करणे लाभदायक

**सिंह**
दिवस तुम्हाला सकारात्मक परिणाम देईल. आज तुमचा संयम ठेवा आणि वेळेनुसार वाटचाल करा.

**कन्या**
भावनांवर नियंत्रण ठेवा, फायदा होईल. मित्र नवीन भेटवस्तू घेऊन येतील. चुकांमधून शिकता

**तूळ**
येईल.व्यवसायात तुमची व्यस्तता वाढेल. तुमची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा सामान्य असेल.

**वृश्चिक**
योजनेवर काम केल्यास तुमची सर्व नियोजित कामे पूर्ण होतील. गुंतवणूक करण्यापूर्वी संशोधन करा.

**धनु**
नुकसान होण्यापासून संरक्षण होईल दिवस आनंद देणारा आहे. अर्धवट कामे आज पूर्ण होतील.

**मकर**
वैवाहिक जीवनात परस्पर समन्वय राहील. चुकांमधून शिकून तुम्हाला पुढे जाण्याची प्रेरणा मिळेल.

**कुम्भ**
स्वतःवर विश्वास ठेवा दिवस चांगला जाईल. व्यावसायिकांनी व्यवसायनियोजन करावे.

**मीन**
आज प्रगतीचे नवीन मार्ग सापडतील. गुंतागुंतीच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील, सावध राहा.

# ठाणेकरांवर कचराकोंडीचे संकट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : वागळे इस्टेट भागात ठाणे महापालिकेच्या कचरा हस्तांतरण केंद्रावर साठलेल्या कचऱ्याच्या ढिगाला शुक्रवारी आग लागली. या घटनेमुळे शिंदे समर्थक आक्रमक झाले आणि त्यांनी केंद्रावर एकही गाडी आणू नका, गाडी आणण्याचा प्रयत्न केलास, गाड्या फोडून टाकून असा इशारा महापालिकेला दिला. त्यामुळे रविवारी शहरात घंटा गाडी आल्या नाही. परिणामी, बऱ्याच भागात कचरा उचलला नसल्याचे चित्र दिसून आले.

वागळे इस्टेट भागातील सीपी तलाव परिसरात ठाणे महापालिकेचे कचरा हस्तांतरण केंद्र आहे. या ठिकाणी शहरातील विविध भागातून संकलित होणारा कचरा आणला जातो आणि त्यानंतर त्याचे वर्गीकरण केले जाते. यानंतर तो डायघर येथे नेला जातो. असे असले तरी याठिकाणी कचऱ्याचे ढिग लागले आहेत. या कचरा हस्तांतरण केंद्राजवळ लोकवस्ती, मोठमोठे गृहसंकुले तसेच औद्योगिक कंपन्या आहेत. कचरा हस्तांतरण केंद्रामुळे परिसरात पसरलेल्या दुर्गंधी आणि घाणीच्या साम्राज्यामुळे स्थानिक नागरिक हैराण आहेत. हे कचरा हस्तांतरण केंद्र हटविण्याची मागणी नागरिकांकडून वारंवार होत आहे. शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी राम रेपाळे यांनीही यापुर्वी हे केंद्र बंद करण्याची मागणी पालिकेकडे केली होती. यामुळे पालिका आयुक्त सौरभ राव यांनी काही महिन्यांपुर्वी हा परिसर कचरामुक्त करण्याची घोषणा केली होती. त्यासाठी परिसरात वर्षानुवर्षे साठलेला कचरा उपसण्याचे काम सुरू केले होते. परंतु, पालिका अद्यापही हा परिसर कचरामुक्त करू शकलेली नाही. या केंद्रातील कचऱ्याच्या ढिगाला शुक्रवारी मोठी आग लागली. या आगीच्या धुराचे लोट परिसरात पसरल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना या भागात असलेल्या कंपनीमधील कर्मचाऱ्यांना याचा खूप त्रास झाला. शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे खासदार नरेश म्हस्के आणि काही पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पालिका अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. यापुढे या केंद्रावर एकही कचरा गाडी आणू नका आणि गाडी आणण्याचा प्रयत्न केला तर, गाड्या फोडून टाकू असा इशारा शिंदे गटाने यावेळी दिला. या इशाऱ्यानंतर रविवारी वागळे इस्टेट भागात घंटा गाड्या आल्या नाही. शहरातील विविध भागातील सोसायट्यांबाहेर ड्रममध्ये कचरा जमा झाला आहे आणि परिसरातील कचराकुंडी जवळ देखील कचरा पसरला आहे.

## भाजपनं दिला आंदोलनाचा इशारा

ज्ञानेश्वरनगर परिसरात पाईप लाईनजवळ रस्त्यालगत कचरा कुंडी आहे. रविवारी सकाळी या कचरा कुंडीजवळ मोठ्याप्रमाणात कचरा पडल्याचे दिसून आले. हा कचरा रविवारी दुपारनंतर रस्त्यापर्यंत आला होता. यामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होत होता. तसेच परिसरात दुर्गंधी पसरली होती. अशीच परिस्थिती तीन पेट्रोल पंप परिसरात, वागळे इस्टेट भागात, लोकमान्य नगर परिसरासह आणखी बऱ्याच ठिकाणी दिसून आली. दरम्यान,या प्रश्नाकडे भाजपाचे महापालिकेतील माजी गटनेते नारायण पवार यांनी लक्ष वेधले असून, महापालिका प्रशासनाकडे तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली. हा कचरा हटविला नाही तर, आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.

# क्रॉफर्ड मार्केट, वरळीतील जागांसाठी पुन्हा निविदा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : महसूलवाढीसाठी पालिकेच्या मालकीच्या जागांचा लिलाव करण्यासाठी जारी केलेल्या निविदेला विकासकांकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे पालिकेने या भूखंडाच्या लिलावासाठी अखेर पुनर्निविदा काढली आहे. या लिलाव प्रक्रियेसाठी तीनपैकी मलबार हिलची जागा वगळून उर्वरित दोन जागांसाठी निविदा काढण्यात आली.

भूखंडांची आधारभूत किंमत पन्नास टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे. महसूल वाढीसाठी पालिकेने मुंबईतील तीन भूखंडांचा लिलाव करण्याचे ठरवले होते. कॉफर्ड मार्केट येथील छत्रपती शिवाजी महाराज मंडईची जागा, मलबार हिल येथील बेस्टच्या रिसिव्हिंग स्टेशनची जागा आणि वरळीतील अस्फाल्ट प्लांटची जागा अशा तीन जागांचा लिलाव करण्याचे ठरवले होते. त्यासाठी निविदाही मागवल्या होत्या. मात्र यापैकी कोणीही निविदा भरली नाही.

मलबार हिल येथील जागेवर बेस्टचे विद्युत उपकेंद्र असून बेस्टचा या जागेचा लिलाव करण्यास विरोध होता. त्यामुळे ही जागा लिलावातून वगळण्यात आली आहे.

# ठाण्यात वाढीव शालेय शुल्काविरोधी पालकांचे आंदोलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - येथील वसंत लॉन्स भागातील न्यू होरायझन शाळा प्रशासनाने अचानकपणे शुल्कात वाढ केल्याचा आरोप करत, पालकांनी शनिवारी सकाळी शाळेच्या परिसरात आंदोलन केले. या शाळेच्या इतर शाखांमध्ये शुल्क कमी आकारले जात असल्याचा दावा करत या शाळेने वाढवलेले शुल्क रद्द करा किंवा सर्व सुविधा उपलब्ध करून द्या अशी मागणी पालकांनी यावेळी केली. दरम्यान या संदर्भात शाळा प्रशासनाशी वारंवार संपर्क साधूनही त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

ठाण्यात वसंत लॉन्स भागात न्यू होरायझोन शाळेची शाखा आहे. या शाळा व्यवस्थापनाने यंदाच्या शैक्षणिक वर्षात शालेय शुल्कात १५ टक्के वाढ केल्याचा आरोप पालकांनी केला आहे. या शुल्क वाढीविरोधात पालकांनी शनिवारी शाळेच्या परिसरात आंदोलन केले. यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अचानकपणे करण्यात आलेल्या शुल्क वाढीचा पालकांनी निषेध नोंदवला. शाळा व्यवस्थापनाने यंदाच्या शैक्षणिक वर्षात शालेय शुल्कात १५ टक्के वाढ केली आहे. या शुल्काबरोबरच पुस्तके, गणवेश, बस गाडीचे भाडे तसेच इतर शैक्षणिक साहित्यासाठी वेगळे पैसे भरावे लागत असल्याचे पालकांकडून यावेळी सांगण्यात आले. या शाळेच्या ठाणे परिसरात इतर ठिकाणीही शाखा आहेत. ही शाखा वगळता इतर शाखांकडून ६२ हजार ते ८४ हजार इतके शुल्क आकारले जाते. मात्र वसंत लॉन्स येथील शाखेत मात्र एक लाख शालेय शुल्क आकारले जात आहे. त्यामुळे इतर शाखांच्या तुलनेत येथे शालेय शुल्क जास्त असल्याचे पालकांनी सांगितले. शालेय शुल्क कमी करा अथवा त्यात सर्व सुविधांचा अंतर्भाव करून घ्यावा अशी मागणी पालकांनी आंदोलना दरम्यान केली. दरम्यान सोमवारी शुल्क वाढी संदर्भात शाळा व्यवस्थापनाची भेट घेणार असल्याचे पालकांनी यावेळी सांगितले. दरम्यान या संदर्भात शाळा प्रशासनाशी वारंवार संपर्क साधूनही त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

# उरणमध्ये महाविद्यालय परिसरात अमली पदार्थांची विक्री ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण** : तालुक्यातील शहर आणि ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थी अंमली पदार्थाच्या विळख्यात अडकत चालला आहे. शाळा, महाविद्यालयांच्या ५०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करण्यास मनाई आहे. तरीही या पदार्थांची सर्रास विक्री केली जात असल्याने अल्पवयीन शालेय विद्यार्थी नशेच्या आहारी जाऊन त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. यातील अनेक विद्यार्थ्यांवर उपचार सुरू आहेत. त्यामुळे अनेक कुटुंब तणावाखाली आहेत.

आपल्या व्यसनासाठी मुलांकडून घरात चोरी आणि पालकांना धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. यात काही पालकांनी मुलांना दिलेले अति आर्थिक स्वातंत्र्यही कारणीभूत ठरत आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते संजय ठाकूर यांनी उरणच्या आमसभेतही आवाज उठला आहे. दरम्यान, अंमली पदार्थाच्या तस्करीचे चक्र तोडून काढण्याचा प्रयत्न असल्याचे मत पोलिसांनी व्यक्त केले आहे. तरुणांना अमली पदार्थाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी मोहीम राबविण्याचे आवाहन उरणचे आमदार महेश बालदी यांनी केले. अमली पदार्थांच्या विक्रीवर पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. उरण पोलिसांनी नुकताच एका कारवाईत गांजा जप्त केला. यापुढे देखील गांजा चरस यांचे रॅकेट तोडून काढण्याला आमचे प्रधान्य राहील अशी माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी दिली.

उरणच्या शेकडो एकर शेतजमिनीवर खारफुटीचे आक्रमण, शेतकऱ्यांवर हातची जमीन गमावण्याची वेळ

शाळा, कॉलेजच्या परिसरात मुझे सिगारेट, दाह, गुटखा यांना ची पडली आहेत. शिक्षण विभाग आणि पोलीस यंत्रणेने याकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन शाळांना भेट देऊन मुलांमध्ये जनजागृती करावी, त्याचप्रमाणे दिवसेंदिवस वाढत असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांबाबतही समुपदेशन करण्याची आवश्यकता असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते संजय ठाकूर यांनी व्यक्त केले.

## समुपदेशनाची गरज

**व्यसनामुळे वेगळाच आनंद मिळतो, रिलॅक्स वाटते, ताण-तणाव कमी होतो, असेही गैरसमज युवकांमध्ये आहेत. एकंदरीत शहरातील तरुणांचे हे नशेचे लोण आता ग्रामीण भागातही पसरत आहे. उरणातील शाळा, कॉलेज परिसरातील अडगळीच्या जागेत युवक-युवती नशा करताना दिसतात. हे रोखण्यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये जाऊन मुलांचे समुपदेशन करण्यावर भर देण्याची मागणी नागरिक करत आहेत.**

# पनवेल-कर्जत उपनगर रेल्वेमार्ग प्रगतीपथावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पनवेल-कर्जत उपनगर रेल्वे मार्ग प्रकल्पाची पूर्णतेकडे वाटचाल सुरू असून या प्रकल्पाचे ७० टक्के काम आतापर्यंत पूर्ण झाले आहे. पनवेल-कर्जत उपनगर रेल्वे मार्ग प्रकल्पाची पूर्णतेकडे वाटचाल सुरू असून या प्रकल्पाचे ७० टक्के काम आतापर्यंत पूर्ण झाले आहे. नियोजित वेळेत सर्व कामे पार पडल्यास हा प्रकल्प २०२५ च्या डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, असे संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी सांगितले.

एका अधिकाऱ्यानुसार, जमिनीसंबंधीचे काम आणि मोठ्या तसेच लहान पूलांचे बांधकाम जोरदारपणे सुरू आहे. यासाठी दोन लॉट्समध्ये कंत्राट देण्यात आले आहेत. आतापर्यंत ४७ पूल आणि एक फूट ओव्हर ब्रिज (FOB) पूर्ण झाले आहेत, तर १६ अतिरिक्त पुलांवर काम सुरू आहे, त्यात फ्लायओव्हर्स समाविष्ट आहेत.

पनवेल, चिकाले, मोहापे, चौक, आणि कर्जत स्थानकांसाठी करार



देण्यात आले आहेत. विशेषतः पनवेल स्थानकावर, स्थानक इमारत, कर्मचारी क्वार्टर्स, ओव्हरहेड इक्विपमेंट (OHE) डेपो आणि पाणी टाक्या बांधकाम प्रक्रिया सुरु आहे. कर्जतकडे असलेला FOB पूर्ण झाला आहे, असे त्यांनी सांगितले. त्याशिवाय, पुणे एक्स्प्रेसवे रेल अंडर ब्रिज (RUB) मध्ये सर्व चार ओपन वेब गर्डर्स (OWG) लॉंच करण्यात आले आहेत, आणि रंगकाम पूर्ण झाले आहे. पनवेल रेल्वे फ्लायओव्हरवर, सबस्ट्रक्चर काम सुरू आहे, आणि ८१ स्पॅन्ससाठी डेक स्लॅब पूर्ण झाले आहे. आठमधून सहा संकलित गर्डर्स उभारले गेले आहेत, आणि OWG फॅब्रिकेशन विविध ठिकाणी सुरू आहे, ज्यात एक गार्डर पनवेल साइटवर वितरीत करण्यात आले आहे.



# मालमत्ता कर भरण्यासाठी नवी मुंबईत नवी प्रणाली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : नवी मुंबईकरांना मालमत्ता कर ऑनलाइन भरताना अनेक तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. या अडचणी सोडविण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने 'भारत बिल पेमेंट सिस्टिम' (बीबीपीएस) ही प्रणाली सुरू केली आहे. प्रणालीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला असून ती पूर्णतः सुरक्षित आहे. या प्रणालीमुळे नागरिकांच्या वेळेची बचत होणार आहे. नवी मुंबईत साडेतीन लाखांहून अधिक नोंदणीकृत मालमत्ता आहेत. नागरिकांना मालमत्ता कर भरता यावा यासाठी महापालिकेने विभाग कार्यालयात सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच ऑनलाइन भरणा करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. असे असले तरी नागरिकांना ऑनलाइन कर भरणा करताना विविध अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे ऑनलाइन कर भरण्याबाबत नागरिकांमध्ये उदासिनता होती. त्यामुळे महापालिकेने आता 'भारत बिल पेमेंट सिस्टिम' ही नवी मालमत्ताकर प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीमुळे मालमत्ताधारकांना त्यांच्या मालमत्ता कराबाबतचा तपशील, थकीत रक्कम, कर भरण्याची अंतिम तारिख याबाबतची माहिती सहजरित्या उपलब्ध होणार आहे. या प्रणालीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला असून ती पूर्णतः सुरक्षित आहे. मालमत्ताधारकाची आर्थिक व व्यक्तिगत माहिती सुरक्षित राहणार असल्याचेही महापालिकेने स्पष्ट केले. मालमत्ताधारकांना एका क्लिकवर विविध प्रकारे मालमत्ताकर भरण्यासाठी सोय उपलब्ध झाली आहे.


# मातीचा ढिगारा अंगावर कोसळून मजुराचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई**: नालासोपारा पूर्वेच्या विवांता हॉटेल जवळ खोदकाम करताना मातीचा ढिगारा अंगावर कोसळून एका मजुराचा मृत्यू झाला आहे. शनिवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास पालिकेचे मलनिस्सारण वाहिनीसाठी खोदकाम करताना ही घटना घडली. ढेना हांसदा (४८) असे मृत्यू झालेल्या मजुराचे नाव आहे.

नालासोपारा पूर्वेच्या विवांता हॉटेल जवळच्या भागात मलनिस्सारण वाहिनी तयार करण्याचे काम वसई विरार महापालिकेने सुरू केले आहे. या कामाचा ठेका इगल इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला देण्यात आला. ही मलनिस्सारण वाहिनी टाकण्यासाठी खोदकाम सुरु करण्यात आले आहे. शनिवारी दुपारी खोदकाम सुरू असताना त्याच्या बाजूचा मातीचा ढिगारा थेट मजुराच्या अंगावर कोसळला. या मातीच्या ढिगाऱ्याखाली ढेना हांसदा हा मजूर दबला गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.

ढेना हांसदा हा मूळचा झारखंड राज्यातील राहणारा असून सध्या तो वसई विरार मध्ये मजुरीचे काम करीत होता. या घटनेची माहिती तुळींज पोलिसांना मिळताच घटनास्थळी



धाव घेत त्याचा मृतदेह बाहेर काढून रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. या प्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात या मृत्यूची नोंद केली असून पुढील चौकशी सुरू असल्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक विजय जाधव यांनी सांगितले आहे.

## ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे दुर्घटना?

**मलनिस्सारण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम केले जात आहे. जवळपास दहा ते बारा फूट इतका खोल खड्डा खणला जात आहे. मात्र त्या ठिकाणी जे मजुर काम करतात त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे लक्ष दिले जात नसल्याने ही दुर्दैवी घटना घडली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या घटनेची सखोल चौकशी करून यात कोणी दोषी असेल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी याशिवाय त्या मजुराच्या कुटुंबाला योग्य मदत मिळावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.**

# अनधिकृत बांधकामांविरोधात उच्च न्यायालयापाठोपाठ राज्य शासनाचीही नियमावली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई**- वाढत्या अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी राज्य शासनाने सर्व महापालिकांना मार्गदर्शक नियमावली जाहीर केली आहे. उच्च न्यायालयानेही अनधिकृत बांधकांना वीज आणि नळ जोडणी न देण्याच्या सुचना दिल्या आहेत. दरम्यान वसई विरार महापालिकेने या नियमावलीनुसार अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी उपाययोजना सुरू केल्या आहेत. मागील ३ वर्षात दीड कोटी चौरस फुटांचे अनधिकृत बांधकामे तोडल्याचा दावा पालिकेने केला आहे. अनधिकृत बांधकामे ही मोठी समस्या आहे. बेकायदा बांधकामामुळे रहिवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. बांधकामाचा वीज, पाणी, रस्ते यासंबंधी देखील परिणाम होत असतो. त्यामुळे अनधिकृत बांधकामांना रोखण्यासाठी उच्च न्यायालयाच्या निर्देशापाठोपाठ राज्य शासनानेही कंबर कसली आहे. सर्व महापालिका अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी नियमावली जाहीर केले आहे. तात्काळ तक्रारी करून गुन्हे दाखल करणे, कारवाईचा अहवाल सादर करणे, झालेल्या तक्रारींचा पाठपुराव करणे, जमिनमालकासही दंड आकारणे आदी सूचना या नियमावलीत देण्यात आल्या आहेत. याशिवाय जमिन मालकासही तक्रार न केल्यास सहआरोपी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या नियमावलीनंतर महापालिकेने अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेऊन कारवाईच्या सुचना दिल्या आहेत.

## सव्वा कोटी बांधकामे निष्कासित केल्याचा दावा

मागील ३ वर्षात १ कोटी २५ लाख अनधिकृत बांधकामे तोडल्याचा दावा पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी केला आहे. या अनधिकृत बांधकाम प्रकरणी ३७५ गुन्हे दाखल करण्यात आला आहे तसेच १ हजार महाराष्ट्र नगररचना प्रांतिक अधिनियमानुसार (एमआरटीपीए) अंतर्गत नोटीसा बजावल्या असल्याचे सांगितले आहे. अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांना अडीचशे नोटीस स्पीड पोस्टने पाठविल्याचेही त्यांनी सांगितले. न्यायालयात असलेल्या सर्व खटल्यांची जलगतीने निवाडा करण्यासाठी वकिलांच्या पॅनलला पाठपुरावा करण्याचे निर्देश दिल्याचेही त्यांनी सांगितले.

# कुडणगाव तलावात मृत माश्यांचा खच



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बोईसर** : तारापूर जवळ असलेल्या कुडण या गावातील तलावातील हजारो मासे मृत झाल्याचे आज सकाळी आढळून आले आहे.तारापूर जवळील कुडण ग्रामपंचायत हद्दीतील माळी स्टॉप जवळील तलावातील हजारो मासे मृत झाल्याचे रविवारी सकाळी आढळून आले.

सकाळी तलाव परिसरात पक्षी निरीक्षणासाठी गेलेल्या एका स्थानिक पक्षी निरीक्षकाला तलावामध्ये मृत माशांचा खच पडल्याचे प्रथम आढळून आले. या परिसरात औद्योगिक सांडपाणी नसताना तलावातील हजारो माशांचा मृत्यु नेमका कोणत्या कारणामुळे झाला हे अस्पष्ट आहे.

याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तारापूर कार्यालयातील क्षेत्रीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी घटनास्थळी भेट देऊन मृत मासे आणि तलावातील पाण्याचे नमुने तपासणीसाठी गोळा केले आहेत.

# सिडको वाहनतळातील दोन वाहनांना आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : 'नवी मुंबईचे शिल्पकार' अशी बिरुदावली मिरवणाऱ्या सिडको महामंडळाने स्वतःच्या मुख्यालयातच बेकायदा वाहनतळ उभारले आहे. टाटा पावर कंपनीच्या उच्च दाबांच्या तारांच्या खाली असणारे हे वाहनतळ मोटारचालकांच्या सोयीचे असले तरी धोकादायक आहे, असे वृत्त देत 'लोकसत्ता' ने या प्रश्नाला वाचा फोडली होती. शुक्रवारी दुपारी याच वाहनतळातील दोन मोटारींनी पेट घेतला. वेळीच अग्निशमन यंत्रणा तेथे आल्याने मोटारींचे अग्नितांडव थांबले आणि अनर्थ टळला.

सिडकोत कामानिमित्त येणाऱ्या नोकरदार वर्ग आणि अभ्यागतांसाठी वाहनतळाचे सुरक्षित नियोजन न केल्यामुळे मुख्यालयाला खेटून बेकायदेशीर वाहनतळ उभारले आहे. शुक्रवारी दुपारच्या सुमारास बेलापूर येथील सिडको भवन समोरील



मुख्यालयाच्या बेकायदेशीर उभारलेल्या वाहनतळामधील दोन मोटारींनी पेट घेतला. काही चालक मोटारीजवळ असल्याने त्यांनी लागलीच इतर उभ्या असलेल्या मोटारी तेथून हलविल्या. त्यामुळे आग पसरली नाही. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

सिडको महामंडळाने शहरांचे नियोजन केले. परंतु स्वतःच्या मुख्यालयाचे काळानुसार बदल करण्यास मंडळाला विसर पडला. यापूर्वीच्या सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांनी भविष्यातील सिडकोचे प्रकल्प ध्यानात घेऊन सिडको भवन उलव्यासारख्या नवीन उपनगराजवळ असावे, असे प्रस्तावित केले होते. मुंबईपासून हाकेच्या मध्यवर्ती ठिकाणी तसेच प्रशस्त वाहनतळ आणि दळणवळणाच्या इतर सोयींनी उपलब्ध असे हे ठिकाण निवडण्याचे नियोजन होते. मात्र अधिकारी बदलले की सिडकोच्या कामांचे प्राधान्यक्रम बदलतात, त्याप्रमाणे तो प्रस्ताव विचारधीनच राहिला.

सिडको भवनासाठी कोणतेही वाहनतळ नसल्याने वाहतूक पोलीस व नवी मुंबई महापालिकेची परवानगी न घेता टाटा पावर कंपनीच्या उच्च दाबांच्या तारांच्याखाली असणारे हे वाहनतळ मोटारचालकांच्या सोयीचे असले तरी धोकादायक आहे. याची तक्रार वारंवार सामाजिक संस्थांनी केली. शुक्रवारची आग नेमकी कशामुळे लागली याची माहिती मिळू शकलेली नाही.

**मालकी हक्क नसणाऱ्या जागेवर बेकायदा अतिक्रमण करून अनधिकृत पार्किंग चालवणाऱ्या संलग्न जबाबदार अधिकाऱ्यांच्या वेतनातून गाड्यांचे नुकसान भरून घेण्यात यावे. प्रशासकीय नियम कायदे पायदळी तुडवत अनधिकृत पार्किंगवर करोडो रुपयांचा निधीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणाऱ्या व खर्च करणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी. टाटा पॉवरने तातडीने सिडकोला पार्किंग बंद करण्याचे निर्देश द्यावेत.**

सुधीर दाणी, संघटक, सजग नागरिक मंच

# महालक्ष्मी गड परिसरात आग १४ दुकाने जळून खाक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डहाणू**: डहाणू तालुक्यातील रानशेत आणि विवळवेढे गावाच्या मधील प्रसिद्ध महालक्ष्मी गडाला (मुसळ्या डोंगराला) शुक्रवार ७ मार्च पासून लागलेली आग आटोक्यात न आल्यामुळे आग वाढून डोंगरावरील महालक्ष्मी मंदिराच्या परिसरात पोहोचली असून आगीत महालक्ष्मी मंदिर परिसरातील दुकाने जळून खाक झाली आहेत. डहाणू तालुक्यातील प्रसिद्ध महालक्ष्मी गडावर (मुसळ्या डोंगर) शुक्रवार पासून मोठा वणवा लागला होता. वनविभागाकडून आग विझविण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र डोंगरावरील जंगलाचा परिसर मोठा असल्यामुळे आग मोठ्या प्रमाणात पसरली असून आग नियंत्रणाबाहेर गेल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान शनीवारी मध्यरात्रीच्या सुमारास आग मंदिर परिसरातील पोहोचली असून यामध्ये परिसरातील १४ दुकाने जळून खाक झाली आहेत.

दैनिक जीवनदीप वार्ता

ठाणे ■ सोमवार ■ 10 मार्च 2025

jeevandeepvartanews2020@gmail.com



# उत्सव स्त्री शक्तीचा



## केबीपी महाविद्यालयात विद्यार्थ्यांची महिला संरक्षणाची शपथ

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**ठाणे** : प्रतिनिधी ठाण्यातील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात संस्थेच्या संचालिका श्रद्धा मोरे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार दिनांक 8 मार्च 2025 रोजी "जागतिक महिला दिन" साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या महिला व बालक विकास अधिकारी विभाग ठाणे संरक्षण अधिकारी रेखा हिंरे यांनी आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या बाल व महिला अत्याचारा विषयी विद्यार्थाना माहिती देऊन अशा प्रकारच्या अत्याचार होऊ नयेत याविषयी जागृत केले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी तशा प्रकारची शपथही घेतली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या हेल्पलाईन विषयी माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात २२५ विद्यार्थांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका जयश्री बलुगडे यांनी तर आभार प्राध्यापिका रेखा नारखेडे यांनी केले. यावेळी प्राचार्या शिवांगी भोसले, प्रा वर्षा सूर्यवंशी आणि प्रा संध्या पाटील, आणि स्नेहल झेंडे ऋचा हडवळे इत्यादी अधिकारीही उपस्थित होत्या.

## इन्फिगो आय केअर रुग्णालायच्या वतीने महिला दिन साजरा

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**मुरबाड दि.८** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शनिवार .८ मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त मुरबाड तालुक्यातील आशा सेविका आरोग्य सेविका तसेच सामाजिक राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांसाठी मोफत नेत्र तपासणी तसेच विशेष सन्मान अभियान आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात जवळपास मुरबाड तालुक्यातील बहुसंख्य महिलांनी सहभाग नोंदवून उत्सुर्त प्रतिसाद दिला.शिबिरात सहभागी झालेल्या सर्व महिलांना हॉस्पिटलच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व विशेष उल्लेखनीय काम करणाऱ्या महिला तसेच महिला मंडळ असे सेविका यांचा सन्मान करण्यात आला.

या शिबिरात महिलांनी तसेच मुरबाड तालुक्यातील नामांकित शिवनेरी मल्टी स्पेशलिस्ट रुग्णालय येथील सर्व महिला कर्मचारी डॉक्टर आरोग्य सेविका यांनी सहभाग नोंदवून महिलांसाठी आयोजित केलेले शिबिराचे कौतुक केले ह्या शिबिराचे यशस्वी नियोजन इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड चे केंद्रप्रमुख रोहित झुंजारराव यांनी केले होते.

## प्राथमिक शिक्षिका रंजना डोहळे यांना जीवन गौरव पुरस्कार

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**मुरबाड-प्रतिनिधी** : मुरबाड तालुक्यातील उपक्रमशील आदर्श शिक्षिका रंजना उत्तम डोहळे यांना " जीवन गौरव पुरस्कार " देऊन सन्मानित करण्यात आले आहे. 8 मार्च जागतिक महिला दिना निमीत्त रोटरी क्लब ऑफ कल्याण डायमंड्सच्या वतीने 8 मार्च 2025 रोजी कल्याण येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्रीमती रंजना उत्तम डोहळे या गेली 27 वर्ष शैक्षणिक क्षेत्रात प्राथमिक शिक्षिका म्हणून उल्लेखनीय काम करत आहेत.

या 27 वर्षाच्या सेवेमध्ये त्यांनी सर्व जाती धर्माच्या तसेच तळागाळातील विद्यार्थ्यांना अनेक शासकीय योजनांचा लाभ त्यांनी मिळवुन दिला आहे. मुरबाड तालुक्यातील मोहरई येथे शाळेत शिक्षिका असताना दिवाळी नंतर कातकरी समाजाच्या मुलांचे विटभट्टीवर होणारे स्थलांतर रोखण्यासाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत हंगामी वसतीगृहाची स्थापना करून मुलांचे स्थलांतर रोखले.त्यांनर दिव्यांग मुलांसाठी असणाऱ्या शासकीय योजना सर्वतोपरी राबविण्यावर भर दिला.

ज्ञानदानाचे पवित्र काम करत असतानाच त्यांना एके दिवशी महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडून "बाल संगोपन" योजनेची माहिती मिळाली.ही योजना मुरबाड सारख्या ग्रामीण भागात अनेक माता भगिनींना माहिती नसल्याने तिचा लाभ माता व बालकांना मिळत नव्हता. डोहळे मॅडम यांनी स्वतः जिल्हा परिषद ठाणे येथे जाऊन या योजनेची माहिती घेतली व या योजनेत बसणार्या महिला शोधून त्यांना लाभ मिळवुन दिला.आज ही अनेक महिला याचा लाभ घेत आहेत.

शैक्षणिक क्षेत्रात आजही सतत नवनिर्मितीचा ध्यास व संकल्पना राबवुन विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सतत धडपडणाऱ्या या आदर्श शिक्षिकेच्या शैक्षणिक कार्याची रोटरी क्लब ने दखल घेऊन जागतिक महिला दिनी म्हणजे 8 मार्च 2025 रोजी कल्याण येथे सन्मानित करण्यात अल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## पालघर जिल्ह्यात लेक माझी लाडकी अभियानास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पालघर प्रतिनिधी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता






**पालघर** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पालघर सांस्कृतिक मित्र मंडळाद्वारे सन २००९ पासून, वंशाचा दिवा मुलगा, हा अट्टाहास न धरता.ज्या कुटुंबातील कर्त्या माता पित्याने आपल्या घरात स्त्री जन्माचे स्वागत करून.एक किंवा दोन मुलींना जन्म देऊन, मोठ्या लाडाने पालनपोषण करून मोठे केले आहे.आशा पालकांचा सत्कार, पालघर सांस्कृतिक मित्र मंडळाने अध्यक्ष केदार काळे व डॉ. उज्वला काळे- नगराध्यक्षा, पालघर. यांच्या कडून दर २ वर्षान करण्यात येत आहे. आजपर्यंत ६६ दांपत्याचा, लेक लाडकी अभियानाअंतर्गत मान्यवर यांच्या हस्ते सन्मान करून सन्मानीत करण्यात आले आहे. दिनांक ८ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या लेक लाडकी सत्कार कार्यक्रमाला पालघर चे आमदार राजेंद्र गावित, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके , पालघर पोलीस उपविभागीय अधिकारी अभिजीत धाराशिवरकर ,शिवसेना शिदें गट जिल्हाप्रमुख कुंदन संख्ये , पालघर पोलीस निरीक्षक अनंत पराड , पालघर आर एस चे आरोग्य अधिकारी डॉक्टर उमेश डिम्पलवार ,पालघर चे ज्येष्ठ चार्ट अकाउंटंट सुहास केळकर , प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर राजेंद्र चव्हाण इत्यादी मान्यवर यांच्या उपस्थित संपन्न करण्यात आला. लेक माझी लाडकी या अभियानाद्वारे मुलगा आणि मुलगी असा भेदभाव न करता मुलीही तेवढ्याच मौल्यवान व महत्त्वाच्या आहेत त्यांच्या जन्माचे स्वागत करा असा संदेश समाजात देण्याचे काम होत आहे. असे आमदार राजेंद्र गावित यांनी सांगितले तर गोविंद बोडके जिल्हाधिकारी पालघर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले, अशा कार्यक्रमामुळे लोकांमध्ये जनजागृती होते व असे कार्यक्रम समाजात होत असले पाहिजेत भारतात जिजामाता,अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले अशा अनेक स्त्रिया यांनी समाजाला शिकवण दिली आहे असे सांगत त्यांनी जागतिक महिला दिन का साजरा होतो याबद्दल विस्तृत माहिती दिली. अभिजीत धाराशिवकर विभागीय पो.अधिकारी पालघर व अनंत.पराड पो. निरीक्षक पालघर पो.ठाणे. यांनी सायबर गुन्हेगारी बद्दल व महिलांच्या सुरक्षेतेबाबत माहिती दिली. कुंदन संखे - पालघर जिल्हा शिवसेना प्रमुख - यांनी आज आनंदाचा दिवस आहे महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत असे आपल्या भाषणात सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश राऊत अध्यक्ष मित्र फाउंडेशन यांनी केले

## कल्याण पंचायत समितीत महिला दिन साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : पंचायत समिती कल्याण येथे जागतिक महिला दिन साजरामहिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर संपन्न दि.८ (जिल्हा परिषद, ठाणे)- जागतिक महिला दिनानिमित्ताने दि.०७ मार्च, २०२५ रोजी पंचायत समिती कल्याण येथे महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आला होता. शिबिराचे उद्घाटन पंचायत समिती कल्याण, गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी कार्यालयात उपस्थित महिला अधिकारी व कर्मचारी यांना गुलाब पुष्प देऊन जागतिक महिला दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

शिबिरासाठी गट शिक्षणाधिकारी डॉ.रूपाली खोमणे, उप अभियंता बांधकाम सुदाम महाडिक, सहाय्यक गट विकास अधिकारी रघुनाथ गवारी, कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे, तसेच पंचायत समिती येथील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरामध्ये पंचायत समिती कल्याण येथील सर्व महिलांची संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये सर्वांचे शुगर तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी, स्त्री रोग तज्ञ यांच्याकडून तपासणी, रक्तगट तपासणी, Diabetes Profile, Lipid profile, liver Profile, Kidney Profile□ यासारख्या सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या करण्यात आल्या. तर 74 महिलांचे आभा कार्ड तयार करण्यात आले तसेच 22 लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड तयार करून त्यांना गटविकास अधिकारी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भारत मासाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण आरोग्य कर्मचाऱ्यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी उत्साह पुर्ण वातावरणात सहभाग नोंदविला.

## कर्करोग प्रतिबंधक लसीकरणाने केडीएमसीच्या महिला दिनाचा प्रारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता




**कल्याण** : जागतिक महिला दिनी कल्याण डोंबिवली महापालिकेचा आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि रिजेन्सी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी कल्याण पूर्व नेतिवली येथील प्रबोधनकार ठाकरे शाळेत "मिशन रक्षा" या अभिनव उपक्रमांतर्गत 9 ते 14 वयोगटातील शालेय विद्यार्थीनीना गर्भाशय मुखाची कर्करोग प्रतिबंधक लस देण्यात आली. महानगरपालिकेने "मिशन रक्षा" या नव्या उपक्रमास प्रारंभ केला असून गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करण्यासाठी शालेय विद्यार्थीनीच्या पालकांमध्ये कर्करोग प्रतिबंधासाठी जनजागृती करून सदर लस विद्यार्थीनीना देण्यासाठी त्यांच्या पालकांचे संमती पत्र घेवून सदर लस प्रबोधकार ठाकरे शाळेतील एकूण 84 मुलींना देण्यात आली.

आज भारतात बरेचशे मृत्यु हे ब्रेस्ट कॅन्सर व सर्वायकल कॅन्सर मुळे होत आहेत आणि आता सर्वायकल कॅन्सरच्या प्रतिबंधासाठी लस उपलब्ध झाली असून ती आपण 09 वर्ष वयोगटापासून 14 वर्ष वयोगटाच्या मुलींना देवू शकतो. सीएसआर फंडाच्या माध्यमातून ही लस महापालिकेस उपलब्ध झालेली असून उपलब्ध लस टप्प्याटप्प्याने महापालिकेच्या इतर शाळांमधील शालेय विद्यार्थीनीना दिली जाईल अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी या कार्यक्रमावेळी दिली.

यावेळी महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. दिपा शुक्ल, वैद्यकिय अधिकारी सुहासीनी बडेकर, डॉ. विनोद दौंड, डॉ. प्रज्ञा टिके इतर वैद्यकीय अधिकारी तसेच आयएमए कल्याण च्या अध्यक्षा डॉ. सुरेखा इटकर, आयएमए डोंबिवली च्या पदाधिकारी डॉ. निती उपासनी, महापालिका उपायुक्त संजय जाधव, महापालिका शिक्षण अधिकारी विजय सरकटे, इतर अधिकारी, शिक्षक वर्ग व मुलींचे पालक तसेच महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या आशा वर्कर्स ,ए एन एम उपस्थित होत्या.

## महिला दिना निमित्त उमरोली (पिराची) येथे मोफत कॅन्सर तपासणी शिबीर संपन्न!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड-प्रतिनिधी** : मुरबाड विधानसभेचे कार्यक्षम आमदार सन्मा. किसनजी कथोरे हे गेले काही वर्ष महिलांच्या आरोग्यावर विशेष लक्ष देऊन त्या दृष्टीने काम करत आहेत. मुरबाड विधानसभा मतदार संघातील मागिल पाच वर्षात हजारो महिलांचे रक्तातील हिमोग्लोबीन चे प्रमाण तपासणी मोहीम हाती घेतली होती.

यावर्षी त्यांनी महिलांच्या कॅन्सर तपासणीवर भर दिला असून त्यादृष्टीने गोवेली येथील रूग्णालयात तपासणी व उपचार केंद्र सुरू केले असल्याची माहिती त्यांनी दिली असून वेळोवेळी ते आपल्या मार्गदर्शन पर भाषणात महिलांना तपासणी करून घेण्याचे आवाहन करत असतात. त्यांच्या च मार्गदर्शनाखाली उमरोली बू. ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सौ. पूनम हरिश्चंद्र पवार यांनी गावातील व परिसरातील महिलांसाठी एचसिजी मानवता कॅन्सर सेंटर नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त मोफत कॅन्सर शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरामध्ये 100 पेक्षा जास्त महिलांची तपासणी करण्यात आली.

या शिबिराला उमरोली बू.ग्रामपंचायत सरपंच सौ.देवकी पवार,मुरबाड पंचायत समितीचे माजी सभापती .दीपक पवार, बुधाजी बंगाल, सौ. रेश्मा घरत,सौ. कोमल दिनकर,सौ. सुवर्णा गायकर आदी मान्यवर उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

## फांगणे येथे आजीबाई शाळेचा दशक पूर्ती सोहळा संपन्न











दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड दि.९** जगप्रसिद्ध आजीबाई शाळा मुरबाड तालुक्यातील फांगणे येथे दशक पूर्ती सोहळा दिमाखदार रितीने साजरा झाला.

शिक्षणाला वयाचे बंधन नसते हे तत्व जगाला दाखवून देणा-या आजीबाई शाळा फांगणे यांनी दहा वर्षे पूर्ण केल्या बद्दल भव्य सोहळयाचे आयोजन फांगणे गावी करण्यात आले होते.कै.मोतीराम गणपत दलाल चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून समाज सेवक दिलीप दलाल यांच्या योगदानातून इतिहास संशोधक, योगेंद्र बांगर यांनी आजीबाई शाळेचा शुभारंभ केला..शितल मोरे यांनी या आजीबाईंना ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. देशविदेशातील अनेक पत्रकार, मान्यवरांनी येऊन या शाळेचे कौतुक केले आहे. तसेच महागणपती हास्पिटल टिटवाळा यांच्या वतीने आयोजित भव्य आरोग्य शिबिराचा महिला व आजीबाईंनी लाभ घेतला.

कौन बनेगा करोडपती कार्यक्रमात महानायक अमिताभ बच्चन यांनी या आजीबाईच्या जिद्दी विषयी प्रशंसा केली आहे दशक पूर्ती सोहळया निमित्त भजनी मंडळ फांगणे, स्नेह परिवार मुंबई, आजीबाई शाळा फांगणे यांच्या वतीने भव्य मिरवणूक व दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता. सुरूवातीला ज्यांच्या शुभहस्ते शाळेचा शुभारंभ झाला होता अशा मातोश्री इंदुमती मोतीराम दलाल यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. आजीबाई शाळेचा वाढदिवस कलिंगड कापून सालाबादप्रमाणे यंदाही साजरा करण्यात आला.

यावेळी स्नेह परिवार सेनापती अशोक वायकूल, उद्योगपती रामकृष्ण कोलवणकर, प्रसिद्ध अभियंते तुकाराम जंगम, सरपंच वैभव सरोदे, सामाजिक कार्यकर्ते हेमंत देशमुख, उपस्थित होते.अशोक वायकूल यांनी स्नेह परिवारातर्फे देदीप्यमान कामगिरी बजावणाऱ्या महिला भगिनींचा सत्कार करण्यात आला.आजीबाईना गुडघेदुखी शामक पँड गुलाबी लुगडी, दप्तरे, पाट्या, पेन्सिल, खाऊ,औषधे अशा वस्तू स्नेह परिवारातर्फे भेट देण्यात आल्या.या प्रसंगी विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात आले.शिक्षिका शितल मोरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रकाश मोरे काळूराम केदार,योगेश तेलवणे, नितीन देशमुख, आकाश गायकवाड हभ.प. नामदेव केदार,अशोक पांडुरंग केदार अंकुश केदार, संभाजी केदार,,नानू वाघ,जयराम केदार, पांडुरंग केदार, निखिल देशमुख, एकनाथ देशमुख, दत्तात्रेय देशमुख, भास्कर देशमुख, यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेंद्र बांगर यांनी केले आभार गितेश देसले यांनी मानले.

## महिला दिनानिमित्त नाना टिळक विद्यालयात रांगोळी स्पर्धा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : नाना टिळक प्राथमिक विद्यालय वावोशी येथे महिला दिनाचे औचित्य साधून माता पालकांसाठी व शालेय मुलींसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला सरस्वती पूजन करून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला यावेळी शालेय मुलींनी ईशस्तवन सादर केले. या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विद्या धनाजी घरत उपसरपंच सौ.दिपा शिर्के शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सौ. शितल यादव,ग्रामपंचायत सदस्या सौ रिया वालम ,अंगणवाडी सेविका पल्लवी मोरे, दर्शना मोरे, रेखा धारवे, आशा वर्कर श्रुती उदेकर भारती पाटील प्राथमिक आरोग्य केंद्रातील परिचारिका सौ.अडसुळ मॅडम एस एस म्हात्रे, सेवानिवृत्त शिक्षिका सौ.नंदा शेट्ये शालेय पोषण आहारच्या सुलभा राजपूरकर टाटा फाउंडेशन शिक्षिका आरती पाटील अंजू मोरे विद्या शेट्ये दिपाली केदारे रंजना भऊड आदिसह माता पालक शिक्षक पालक शाळा व्यवस्थापन समितीच्या महिला उपस्थित होत्या.यावेळी माता महिला व शालेय मुलींसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.सर्व उपस्थित महिलांना गुलाब पुष्प व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रास्ताविकातून मुख्याध्यापिका सौ विद्या घरत यांनी सांगितले की आज सर्वच क्षेत्रात महिला पुढे असून उत्तुंग यश संपादन करतात याचा सार्थ अभिमान आहे.तर पल्लवी मोरे यांनी महिलांवरील दिवसेंदिवस होत असलेले अत्याचार व वाढत असलेल्या विविध घटना याविषयी सविस्तर माहिती सांगून महिलांनी यशाची शिखरे पादाक्रांत करण्याचे व नारी शक्तीची ताकद उंचावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.दिपाली केदारे यांनी महिला दिन साजरा करण्याचे व महिलांना योग्य ती वागणूक व सन्मान मिळाला पाहिजे यासाठी प्रत्येक महिलेने जागरूक राहून काम करण्याचे सांगितले.कार्यक्रमासाठी सुनिल पवार व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले .शालेय मुलींनी महिला दिनानिमित्त भाषणातून महिलांचे प्रश्न उपस्थित करून मान्यवरांची वाहवा मिळवली.सुत्रसंचलन आरोही पाटील व संकिर्णा पाटील या विद्यार्थ्यांनीनी केले.आभार दिपाली केदारे यांनी केले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com